संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सत्नेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सत्नेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६२ वा ● ● मंगळवार दि. २६ सप्टेंबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# आमदार अपात्रता प्रकरणी दुसरी सुनावणी संपली

## पुढील सुनावणी १३ ऑक्टोबरला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार काल (२५ सप्टेंबर) विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात सुनावणी पार पडली. कालच्या सुनावणीनंतर आता पुढील सुनावणी १३ ऑक्टोबर रोजी होणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

या सुनावणीमध्ये वेळापत्रक निश्चित होणार असले, तरी ही प्रक्रिया यावर्षी पूर्ण होण्याची शक्यता धुसर आहे. या संभाव्य वेळापत्रक पत्रकात कागदपत्र तपासणी, त्याचबरोबर साक्ष नोंदवणे, उलट तपासणी मुद्द्यांचा समावेश असल्याने या प्रक्रियेत तीन महिन्यांचा कालावधी जाण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन असल्याने त्या दरम्यानच्या कालावधीत सुनावणी होण्याची शक्यता धुसर आहे. त्यामुळे आमदार अपात्रता प्रकरणी यावर्षी निकाल लागणे कठीण असून जानेवारी २०२४ मध्ये निर्णय येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, आजच्या सुनावणीला ठाकरे गटाकडून अनिल परब, अनिल देसाई, सुनील प्रभू, मुंबईतील आमदार उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षांसमोर एकूण ३४ याचिका आहेत. या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी वेळापत्रक निश्चित होणार आहे. आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांकडून दिरंगाई होत असल्याने ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांच्या



कार्यशैलीवर अत्यंत कडक शब्दात सुनावले होते. त्यानंतर सुनावणीसाठी वेग आला आहे. मागील सुनावणीत शिंदे गटाकडून कागदपत्रे मिळाली नसल्याचा दावा करण्यात आला होता. त्यामुळे त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी देण्यात आला होता.

आजच्या सुनावणीनंतर सर्व दाखल याचिकांवर वेळापत्रक निश्चित होण्याची शक्यता आहे. सर्व याचिकांवर एकाचवेळी सुनावणी घेण्याची मागणी विधानसभा अध्यक्षांकडे करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीमध्ये विधानसभा अध्यक्षांना आमदार अपात्रता प्रकरणांमध्ये मागील चार महिन्यांमध्ये नेमक काय केलं? याचा लेखाजोखा मांडायचा आहे. मागील आठवड्यात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिल्ली दौरा करत काही कायदे तज्ज्ञांचा या सगळ्या प्रकरणात सल्ला घेतला होता. दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयात आमदार अपात्रतेप्रकरणी पुढील सुनावणी ३ ऑक्टोबर रोजी पुन्हा असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या कम्प्युटर जनरेटेड तारखा असल्यामुळे यामध्ये बदल होण्याची देखील शक्यता आहे.

# विट्यात धनगर समाजाचा मोर्चा संपन्न



**विटा : येथे चौंडी येथे धनगर समाजाच्या मागणीसाठी सुरु असलेल्या मोर्चामध्ये सहभागी समाजबांधव**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** चौंडी येथे सुरू करण्यात आलेल्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी विटा येथे धनगर समाज कृती समितीच्या वतीने विटा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. विटा येथील बिरोबा मंदिरापासून मोर्चाला सुरूवात झाली. मोर्चा मायणी रस्ता, चौंडेश्वरी चौक मार्गे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. या आंदोलनाला शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय विभूते, ओबीसी नेते संग्राम माने, संदीप ठोंबरे, गजानन सुतार यांनी आंदोलनस्थळी येऊन पाठिंबा व्यक्त केला.

यावेळी राजू जानकर, परमेश्वर कोळेकर, संजय विभूते, संग्राम पाटील, गजानन सुतार, संदीप ठोंबरे, संग्राम माने यांची भाषणे झाली. या मोर्चामध्ये भाऊसाहेब पाटील, शिवाजी हारुगडे, भरत लेंगरे, किसन जानकर, सुनील मेटकरी, प्रताप कचरे, बाळासाहेब मेटकरी, संदीप मेटकरी, सागर पाटील, पै.राहुल रुपनर, तेजस लेंगरे, बंडू कातुरे, शशिकांत तरंगे, सुभाष मेटकरी, युवराज मेटकरी, सूर्यकांत मेटकरी, रवींद्र ठोंबरे, संजय पाटील, अधिक धडस, शंकर पाटील, दिलीप काळेबाग यांच्यासह समाजबांधव व महिला सहभागी झाल्या होत्या.

# दिघंचीत सभामंडपाचे भूमिपूजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** आटपाडी तालुक्यातील दिघंची येथे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या माध्यमातुन महादेव मंदिरासमोर मंजूर करण्यात आलेल्या सभामंडप कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी भाजयुमो जिल्हाध्यक्ष अनिल पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष जयवंत सरगर, आरपीआय जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात, बाजार समितीचे संचालक आबा पुजारी, सरपंच रमेश दडस, माजी सरपंच अमोल मोरे, शेखर रणदिवे, नवनाथ रणदिवे, अनिल सुर्यवंशी, प्रणव गुरव, सागर ढोले, विशाल पुजारी, रावसाहेब खटके, समाधान पाटील, शाहिर जयवंत रणदिवे, आप्पासाहेब गोंजारी तसेच सर्व मान्यवर व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



**दिघंची : येथे सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन करताना आमदार गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, जयवंत सरगर व उपस्थित मान्यवर**

# पंकजा मुंडेच्या साखर कारखान्याला नोटीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**बीड :** भाजपा नेत्या पंकजा मुंडे चेअरमन असलेल्या परळीतील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याकडं १९ कोटी रूपयांची जीएसटी रक्कम थकली आहे. यामुळे कराची वसुली आणि मालमत्ता जप्ती संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटी आयुक्तांनी कारखान्यास नोटीस जारी केल्याचं बोललं जात आहे.

यावर आता पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, जे आकडे सांगितले जातात, ते व्याजाबाबत आहेत. कुठेही काहीही चुकीचं झालं नाही. कारखाना तोट्यात असतानाही शेतकऱ्यांचे पैसे देण्यात आले आहेत. ऊस आणि आर्थिक परिस्थितीमुळे कारखाना चालला नाही.

राज्यातील भाजपा नेते तुमची कोंडी करत आहेत? कितीदिवस ही कोंडी सहन करणार? या प्रश्नांवरती पंकजा मुंडे म्हणाल्या, मी सहनशील कन्या आहे. कितीदिवस सहन करायचं, हे ज्योतिषाला विचारून सांगते. कारखान्याला मिळालेल्या नोटीसीबाबत अपक्ष आमदार बच्चू कडू यांनीही भाष्य केलं आहे.

पंकजा मुंडे यांनी यात्रा काढली आणि त्या स्वतः महाराष्ट्रामध्ये फिरल्या, त्यामुळेच त्यांच्यावर कारवाई सुरू झाली असेल, असं मला वाटतं असं वक्तव्य बच्चू कडू यांनी केले आहे.

# तमिळनाडूत भाजपाला मोठा धक्का, मित्रपक्षानं साथ सोडली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशभरातील सर्व पक्ष कामाला लागले आहेत. इंडिया आघाडी आणि एनडीए अशी कडवी झुंज आगामी लोकसभा निवडणुकीत पाहायला मिळणार आहे. इंडिया आघाडीच्या बैठका सुरू असून एनडीएनेही कंबर कसली आहे.

परंतु, निवडणुकीच्या आधीच एनडीएला मोठा धक्का बसला आहे. तमिळनाडूतील मोठा पक्ष ऑल इंडिया द्रविड़ मुनेत्र कड़गमने एनडीएचा पाठिंबा काढून घेतला आहे.

तामिळनाडूमध्ये भाजपा आणि एआयएडीएमकेचा वाद विकोपाला गेला आहे. भाजपा नेत्यांकडून सातत्याने एआयएडीएमकेच्या नेत्यांवर टीका केली जात असल्याचा दावा एआयएडीएमकेकडून करण्यात आला आहे. त्यामुळे एनडीएतून बाहेर पडण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. पक्षाची बैठक घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. २ कोटी स्वयंसेवकांच्या मताचा आणि इच्छेचा आदर करून एआयडीएमके आजपासून राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून माघार घेत आहे, असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला आहे.

एआयडीएमके च्या अधिकृत ट्विटर खात्यावरून ट्वीट करण्यात आलं आहे.

एआयडीएमके च्या प्रवक्त्या ससिरेखा म्हणाल्या की, भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीशी संबंध तोडण्याचा ठराव पक्षातील सदस्यांच्या मतानुसार घेण्यात आला आहे. तसंच, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही उत्सुक आहोत.

तामिळनाडू भाजपचे प्रमुख के अन्नामलाई यांनी तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री आणि द्रविडियन आयकॉन सीएन अन्नादुराई यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. तसंच, जे जयललिता यांच्यावरही टीका केली होती त्यानंतर, तामिळनाडूमध्ये मोठा वाद निर्माण झाला होता. या वादानंतरच एनडीएतून एआयडीएमके मधून माघार घेतली आहे.

# गटविकास अधिकाऱ्यांनी स्वत: हातात झाडू घेत दिले स्वच्छतेचे धडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगूळकर यांनी दिघंची, राजेवाडी, आटपाडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत स्वतः हातात झाडू घेत शालेय स्वच्छतेचे धडे विद्यार्थ्यांना दिले. दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीमध्ये संपूर्ण भारतभर स्वच्छता पंधरवडा साजरा होणार आहे.

या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळा स्तरावर करण्यात आलेले होते. त्यापैकीच स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे, स्वच्छता अंगी बाणावी, सामाजिक स्थळे प्रार्थना मंदिरे व सार्वजनिक ठिकाणी पालकांनी व ग्रामस्थांनी या सप्ताहाच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबवायची आहे व या कमी सर्वांनी स्वच्छतेची मोहीम स्वतःपासून राबवावी असे आवाहन गट विकास अधिकारी मुक्तेश्वर माडगूळकर यांनी केले.यावेळी पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे गट समन्वयक तथा शिक्षण विस्तार अधिकारी अशोक म्हेत्रे तसेच समग्र शिक्षा अभियानचे प्रशांत चंदनशिवे यासह शाळेतील शिक्षक, शिक्षिका व पालक वर्ग उपस्थित होते.

अशोक म्हेत्रे यांनी संपूर्ण सप्ताहामध्ये राबवल्या जाणाऱ्या शाळास्तरीय कार्यक्रमाची अंमलबजावणी उपस्थित त्यांना करून दिली. तर प्रशांत चंदनशिवे यांनी स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. यावेळी राजेवाडी गावचे सरपंच प्रशांत शिरकांडे, शिक्षण प्रेमी बाळासाहेब शिरकांडे, तसेच राजेवाडी शाळेचे मुख्याध्यापक हणमंत गायकवाड, हरिदास जावीर, रवींद्र भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.




**दिघंची : येथे गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगूळकर यांनी स्वतः हातात झाडू घेत विद्यार्थ्यांना दिले स्वच्छतेचे धडे**

# जांभूळणीत गावठाण हद्दीत ग्रामपंचायत सदस्यांचे अतिक्रमण

## शिवराम मासाळ : गांधी जयंतीपासून आमरण उपोषणाचा इशारा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** जांभुळणी येथील ग्रामपंचायतीच्या तीन सदस्यांनी गावठाण हद्दीमध्ये अतिक्रमणे करून बेकायदेशीर बांधलेली घरे काढून त्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याच्या मागणीसाठी बळीराजा फाउंडेशनचे अध्यक्ष शिवराम मासाळ यांनी २ ऑक्टोबर, गांधी जयंती दिनापासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

जांभुळणी येथील ग्रामपंचायत सदस्य सौ.वनिता दत्तात्रय पाटील, मोहन सुनील माने व सौ.रेश्मा यशवंत वाघमारे यांनी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी गावठाण हद्दीमध्ये अतिक्रमण करून बेकायदेशीररित्या घरे बांधलेली आहेत. याबाबत ग्रामपंचायतीसह वरिष्ठ प्रशासनाकडे अतिक्रमणे काढण्याबाबत व सदस्यत्व रद्द करण्याचा अहवाल करण्याबाबत मागणी केली होती.



**शिवराम मासाळ**

गटविकास अधिकारी यांनी सरपंच, ग्रामसेवक यांना अतिक्रमण काढण्याबाबत कळवले होते. परंतु पंचायतीने व विस्तार अधिकारी यांनी संगनमताने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यानंतर स्मरणपत्रे देऊनही अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याबाबत व त्याचा चौकशी अहवाल मिळणेबाबत अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

कारवाई करणेबाबत सरपंच, उपसरपंच व काही सदस्य यांनी नाकर्तेपणा दाखवल्यामुळे ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व उपसरपंच यांचे सदस्य मंडळ बरखास्त करण्याची मागणी मासाळ यांनी केली आहे. यासाठी २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीपासून आटपाडी पंचायत समितीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे शिवराम मासाळ म्हणाले आहेत.

भाऊ कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# चौंडेश्वरी पतसंस्थेची शुक्रवारी वार्षिक सर्वसाधारण सभा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील अग्रगण्य असलेल्या चौंडेश्वरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. आटपाडीची सर्वसाधारण सभा ही शुक्रवार दिनांक २९ रोजी होणार असून या सभेला सभासदांनी मोठ्या संख्येने हजर रहावे असे आवाहन चेअरमन राहुल सपाटे यांनी केली आहेत.

चौंडेश्वरी पतसंस्थेची सन २०२२-२०३ या आर्थिक वर्षांची ३३ वी वार्षीक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २९ रोजी सायंकाळी ०८.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे कार्यालयात संपन्न होणार आहे. यामध्ये संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२२-२०२३ मधील निव्वळ नफ्याच्या नफा भागणीस मंजूर देणे. सन २०२२-२०२३ सालाचे अंदाजपत्रकापेक्षा कमी-जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२३-२०२४ सालाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे व त्यांच्या वसुलीची नोंद घेणे.



**राहुल सपाटे**

संस्थेचे सन २०२३-२०२४ या सालातील वैधानिक लेखापरिक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे. संस्थेचे सन २०२२-२०२३ या सालातील वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे. सभासद प्रशिक्षणा बाबत आदी विषयावर या सभेमध्ये चर्चा होणार आहे.

# संपादकिय

## कॅनडा खलिस्तानवादी दहशतवादी आश्रय देण्याचे कारण काय?

कॅनडामधील खलिस्तान टायगर फोर्सचा प्रमुख हरदीप सिंह निज्जर वाहन चालकाच्या आसनावर मोटारीत बसला होता. अचानक दोन युवक तेथे आले व त्यांनी त्याच्यावर गोळीबार करून ते पसार झाले. ज्याची हत्या झाली, तो खलिस्तानी आणि दहशतवादी होता. भारत सरकारला अनेक गंभीर गुन्ह्यामध्ये तो पाहिजे होता. भारताने तर हरदीपसिंह निज्जरला फरारी म्हणून घोषित केले होते. त्याला शोधून देणाऱ्यास दहा लाखांचे इनाम पोलिसांनी जाहीर केले होते. एक दहशतवादी ठार मारला गेला तर कॅनडाच्या पंतप्रधानांनी आदळआपट करण्याची व तीसुद्धा एवढ्या उशिरा करण्याची गरज काय भासली? घटनेनंतर तीन महिन्यांनी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी कॅनडाच्या संसदेत या घटनेसंबंधी एक निवेदन केले. जून महिन्यात ब्रिटिश कोलंबिया भागात निज्जरच्या झालेल्या हत्येमध्ये भारत सरकारच्या एजंटचा हात असू शकतो, असा त्यांनी गंभीर आरोप केला.

ज्याची कॅनडात हत्या झाली, तो निज्जर मुळातच खलिस्तानवादी, देशद्रोही. तो खतरनाक दहशतवादी होता. अनेक गुन्ह्यांमध्ये तो भारताला पाहिजे होता. मग अशा निज्जरला कॅनडाचे नागरिकत्व मिळालेच कसे? भारताने कॅनडाला २६ खतरनाक दहशतवादी व खलिस्तानवाद्यांची यादी दिलेली आहे, त्यांना भारताच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी भारताने कॅनडाकडे यापूर्वीच केली आहे. भारताने कॅनडाने केलेल्या आरोपानंतर खंबीर भूमिका घेतलीच पण कॅनडापुढे मान तुकविण्यास नकार दिला हे जास्त महत्त्वाचे आहे. भारतावर आरोप करण्यापूर्वी पुरावे द्यावेत, असे भारताने कॅनडाला स्पष्ट शब्दांत खडसावले आहे. पण या घटकेपर्यंत कॅनडाने भारताला पुरावे दिलेले नाहीत.

कॅनडाच्या भूमिकेला अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया यांनी पाठिंबा दिला असला तरी कॅनडातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे नेते पिएरे पोलिवियरे यांनी पंतप्रधान ट्रुडो यांनी पुरावे सादर करावेत, आम्हालाही त्याची माहिती असणे जरुरीचे आहे, असे म्हटले आहे. कॅनडाच्या भूमीवर झालेल्या हिंसाचाराबद्दल थेट भारताला जबाबदार धरणे अतिशय गंभीर असल्याचे भारतानेच म्हटले आहे. शिखांना विरोध असण्याचे कारण नाही, पण खलिस्तानवादी व दहशतवादी यांना आश्रय देण्याचे कारण काय?

मुंबई-पुणे पॅटर्न आता आपल्या दिघंची व आटपाडीमध्ये...
ज्ञानसारथी ॲकॅडमी
पोलिस/सैन्य भरती / स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
महाराष्ट्र पोलीस
जिल्हा परिषद
तलाठी भरती
आरोग्य विभाग
वनरक्षक भरती
राज्य उत्पादन शुल्क विभाग

MPSC
PSI/STI/ASO
SSC
Railway
Banking Exam
TET
आमची वैशिष्ट्ये
• अनुभवी व तज्ञ मार्गदर्शक • लेखी व मैदानी तयारी
• सुसज्ज व प्रशस्त क्लासरुम • आठवड्याला सराव पेपर
• सुसज्ज अभ्यासिका • मुला-मुलींसाठी निवासी बॅचेस
Admission Open...
संचालक व मार्गदर्शक-आण्णा पाटील सर
M.A /M.sc(Mumbai & Kolhapur University),HRM From Welingkar Institute(Mumbai.)
Mob.9220773483 / 8080194141
दिघंची शाखा आटपाडी

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत...........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789/ 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.

## मुस्लीमांनो!, स्वपरिवर्तनाचा नया दौर आणुया!, धार्मीक स्थळांना, विश्वव्यापी शैक्षणीक क्रांतीचे केंद्र बनवु या!!

मुस्लीमांनी, भारतात वक्फच्या नियंत्रणा खालील लाखो हेक्टर क्षेत्रावर असणाऱ्या, लाखो मशिदी, दर्गे, मदरसे, मुस्लीम देवस्थानांच्या इनामी जमीनी, प्रचंड अशी इदगाह मैदाने आणि कबरस्थानच्या जमीनीं पैकी बहुतांश भाग, विश्वव्यापी शैक्षणीक क्रांतीचे केंद्र बनवण्यात गावोगावी उपयोगात आणावा आणि स्वपरिवर्तनाचा नया दौर साकारावा. असे माझ्या सारख्या जमिनीवरल्या कार्यकर्त्याला वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळात सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या मुस्लीम समाजाची गत ७३ वर्षात प्रचंड अधोगती झाली आहे . प्रचंड दारीद्र्य, भयावह मागासलेपणा, शिक्षणाची वानवा, उध्वस्त झालेले धंदे व्यवसाय, शेती, शेती पुरक व्यवसायापासून मुस्लीमांची कोसो दुरची निर्माण झालेली दयनीय अवस्था, पराकोटीचा अडाणीपणा, ठासून भरलेली अंधश्रध्दा, जग मंगळावर जाण्याची वाटचाल करीत असताना, स्वतः भोवतीच्या , दशावतारात अडकून पडलेले करोडो मुसलमान, हे वास्तव चित्र वेदनादायी आहे. प्रत्येक हजार मुस्लीम घरांचा सर्व्हे करून गत २० वर्षात आपल्या कुटुंबातल्या सर्वांपैकी किती जणांनी उद्योग, व्यवसाय, शेती, विज्ञान, शिक्षण यावरील, मस्तक समृद्ध करणारी पुस्तके, महामानवांची महती दर्शवणारी चरित्रे, अशा सर्वच उपयुक्त विषयावरील किती पुस्तके वाचून काढली असे अभ्यासल्यास प्रत्येक कुटुंबातील एखादाही वाचणारा व्यक्ती निघेल, असे वाटत नाही. याउलट या २० वर्षात मटन, चिकन, मासे, अंडी, बिर्याणी, किती खाल्ली? हे विचारल्यास प्रत्येक कुटूंबाने काही टन मांसाहार केल्याचा निष्कर्ष निघेल. हे वास्तव अत्यंत भीषण आहे.

दिवसातल्या प्रत्येक नमाज नंतरची दीनकी बातची वेळ असेल, पुर्ण एक दिवस, तीन दिवस, चाळीस दिवस, चार महिने धार्मिक कार्यात लावण्याचा वेळ असेल किंवा हजारो, लाखोंच्या उपस्थितीत संपन्न केले जाणारे तीन दिवशीय इस्तमे असतील, अशा कोणत्याच ठिकाणी शिक्षण, उद्योग, व्यवसाय, इतर शेकडो विषयांवरील प्रबोधन, दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणाऱ्या सर्व क्षेत्रातल्या हजारो गोष्टी यावर उहापोह करून या कोट्यावधी बांधवांना सजग, शहाणे, समृद्ध, ज्ञानी, संपन्न करण्याचा प्रयत्न होताना दिसून येत नाही. मुस्लीमांच्या धार्मिक स्थळावरील नमाज, प्रवचनानंतर आपल्या मुला - बाळांचा, आपल्या परिवाराचा, आपल्या समाजाचा पुढच्या पाच वर्षाचा, दहा वर्षाचा, पंधरा वर्षाचा, वीस वर्षाचा, प्रगतीचा, उद्दीष्ट साध्यतेचा, गोल काय असावा, त्याच्यासाठी काय करावे. समाजाच्या सामुहिक शक्तीच्या जोरावर समाजातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, खेळाडू, कलाकार, कारागीर, गरीब, वंचित, उपेक्षित, दिव्यांग, महिलांना, कशाप्रकारे मदत, सहाय्य, पाठबळ देता येईल , यावर कोठेही उहापोह होताना दिसून येत नाही. शंभर ते पाचशे किलोमीटरचा, हजारो वाहनातून प्रवास करीत, शेकडो कोटी खर्च करून इस्तेमासाठी लोक प्रचंड संख्या, आस्थेने , श्रध्देने जातात. अशा इस्तेमात उपस्थिती लावणारी ५० लाख, कोटी पर्यतच्या, उपस्थितीची ताकद मुस्लीम आरक्षण, मुस्लीमांच्या न्याय हक्काच्या गोष्टी मागण्यांसाठी, मुस्लीमां विरोधातल्या अन्याय, अत्याचारा विरोधात, खोट्या गुन्ह्यांतील केसेस विरोधात, बदनाम करण्याच्या खोट्या प्रचारा विरोधात, राज्य - केंद्र सरकार कडे दाद मागण्यासाठी एकवटली जात नाही, हे समाजाच्या धूरीणांचे, सर्व आघाड्यावर काम करणाऱ्या समाज बांधवांचे मोठे अपयश आहे, दुर्दैव आहे. यावर साकल्याने विचार झाला पाहीजे. त्यादिशेने पावले पडली पाहीजेत. तरच मुस्लीम समाज प्रगतीच्या मुख्य प्रवाहात येईल.

पुर्वी गावगाड्यातला, शहरातला मुसलमान पाण्यासारखा स्वच्छ, पारदर्शक, निरपेक्ष प्रेम आणि निखळ भावनेने सर्वांमध्ये मिसळून जात असे, अन्य धर्मिय समाजबांधव ही याच उदात्त भावनेने एकमेकांना आपलेसे करीत, त्यामुळे एकमेकांच्या सुख दुःख, अडीअडचणी, संकटात मानवतेच्या भावनेने हे भिन्न धर्मीय, भिन्न जातीय एकवटत. ही मानवतेची भावना सध्याच्या प्रचंड धार्मिक ध्रुवीकरणाने सर्वत्रच संकुचित बनविली जात आहे. मुसलमानांनी व अन्य धर्मीय बांधवांनी, ही मानवता विरोधी कट्टर धर्मांधतेची शृंखला तोडून इन्सानियतच्या प्यार की दुनियेला बढावा दिला पाहीजे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा. हा मंत्र, .मुस्लीमांनी जीवनमंत्र बनविला पाहीजे, मुस्लीमांच्या चौफेर प्रगतीसाठी, लढू पाहणाऱ्या दलित, ओबीसी, बहुजन आणि उच्चभ्रु नेत्यांची मुस्लीमांनी खुलेआम पाठराखण केली पाहीजे. भारतीय संविधानाचे अध्ययन, मनन, चिंतन केले पाहीजे. वर्षभर संविधान महतीचा जागर करणारे उपक्रम राबविले पाहीजेत. नेकी, पुण्याईचे कार्य समजून, हातातले काम सोडून, अगदी जेवत्या ताटावरून उठून जनाजाला (प्रेताला) खांदा देण्यासाठी धावणारे बांधव, ती मृत व्यक्ती जिवंत असताना त्याच्या सुख दुःखात, अडी अडचणी, विविध प्रकारच्या संकटात मात्र तोंड चुकवत असतात. त्याच्याशी जीवघेणी व्यावसायीक स्पर्धा करतात. त्याच्या विधवेला, त्याच्या मुलाना, प्रचारकी थाटात अन्न, धान्य, तुटपुंजी आर्थिक मदत, कपडालत्ता, देवून फार मोठे उपकाराचे तीर मारल्याचा अविर्भाव आणत असतात. हा सर्वत्र आढळवारा दांभिकपणा थांबला पाहीजे. सर्रास असे प्रकार घडत नसावेत त्यालाही काही सन्माननीय अपवाद असू शकतील . तथापि संकटातल्या प्रत्येकाला मजबुतीने उभे करण्यात, मुस्लीमांनी त्याच्या जीवंतपणीच मदत केली पाहीजे, तरच प्रत्येक त्रस्त व्यक्ती सावरू शकेल, त्याचा प्रपंच वाचेल, त्यांची परवड थांबेल.

भारतीय मुस्लीमांच्या प्रचंड दुरावस्थेला प्रथमतः तो स्वतः जबाबदार आहे. आजचा दिवस भागला म्हणजे झालं, उद्याची चिंता आज नको, या बेफिकीर वृत्तीने करोडो मुस्लीम गोत्यात आले आहेत. अलुतेदारी-बलुतेदारी प्रवाहात समाविष्ट असणाऱ्या, अत्यंत हलाखीत जीवन जगणाऱ्या, गाव गाड्यातल्या काही चांगल्या मुस्लीम नेत्यांचा अपवाद वगळता अनेक मुस्लीम नेतृत्वाला, त्या गावच्या, शहराच्या, तालुक्याच्या, जिल्ह्याच्या नेत्याने, काय इनामदार ! , काय जहागीरदार!, काय सरकार!, काय शेठ!, म्हणून खांद्यावर हात टाकताच, या बेडकांना, बैलाचा आकार लाभल्याचा भास होतो. त्याच धुंदीत ते पुढचे अनेक दिवस वावरत असतात, त्यांना अनेक बाबींचा विसर पडतो . हे पठ्ठे स्वतःहून समाजहिताचे काही करीत नाहीत, दुसरे कोणी करीत असेल तर त्याच्या गळ्यात लोढणा बणण्याचे काम करतात.

कोणत्याच गोष्टीचे पुरेसे ज्ञान नसणारे, केवळ वाढलेले वय, वजन, अगडबंब काया, बाह्यांगाने यथेच्छ सजलेल्या या लोकांना, लग्नात गवाह, वकील बनण्यास मिळाले, माईकवरून थोडेसे बोलायला मिळाले की सारे जग जिंकल्याच्या अविर्भावात वावरणारांनी, समाजाला सतत दिशाहीन बनविण्याचे काम केले आहे. एखाद्याच्या अंत्यविधीला गेल्यावर , कबरस्थानातील दुरावस्थेवर बोलते होणारे, लग्न समारंभावेळी मुलांच्या शिक्षण, अन्य स्थितीने गळा दाटून आणणारे, तेथील वेळ सरताच, पावसाळी छत्र्याप्रमाणे गुल होणारे, हे समाजावर लादले गेलेले गुलदस्ते, समाजाचा जीव घायकुतीला आणत आहेत. याचा त्यांना विसर पडलेला असतो आणि समाजही याविरोधात आवाज उठवायला धजत नाही.

एखादा उत्सव, समारंभाला, रंगरंगोटी, कंपाऊंड साठी, पे वीन ब्लॉक बसविण्यासाठी, किरकोळ दुरुस्त्या बांधकामासाठी पाच पन्नास हजाराची देणगी मिळाल्यावर, सर्व काही मिळाल्याचा अविर्भाव आणणाऱ्या या अल्पसंतुष्ट आत्म्यानी समाजाला दिशाहीन केले आहे, कोणीतरी आपणास देणारा आहे, तो देईल. या आशेने आपल्या कर्तव्यालाच विसरी पाडणारे समाजाचे हे दांभीक नेते, समाजाला अंधकारात लोटताहेत, हे त्यांच्या अथवा समाजाच्या लक्षात येत नाही . समाजाच्या भल्यासाठी झटणाऱ्याला मानायचे नाहीच. हा जन्मजात अवगुण घेवून जन्मलेले हे महोदय, कुत्र्याच्या शेपटीसारखे वाकडे राहण्यातच धन्यता मानतात हे दुर्देव आहे. त्यांचे सरळ होणे या जन्मात तरी अशक्य असल्याचे दिसते.

मुस्लीमांकडे केवळ मतपेढी म्हणून बघणाऱ्या राज्यकर्त्यांनीही, मुस्लीमांपुढे, धर्मांध शक्तीच्या भीतीचे बागुलबुवे नाचवत मुस्लीमांना उपेक्षित ठेवले. सर्व महिला शिक्षिकाच असणाऱ्या मुलींच्या शाळेवर, बदलुन एक पुरुष शिक्षक येतात . काही महिन्यानंतर एका शाळेत निघालेला भला मोठा साप बघून, सर्व शिक्षिका, सर्व मुली, साप निघाला, गडी माणूस बोलवा. असे ओरडू लागतात. त्या शाळेतले ते पुरुष शिक्षकही, साप निघाला, गडी माणूस बोलवा. असा गलका करतात. त्या बहुसंख्येतल्या मुली व महिला शिक्षिकेंच्या सानिध्यात वावरत असल्याने ते शिक्षक, ते स्वतः गडी माणूस असल्याचे विसरून जातात. अगदी याच प्रमाणे, प्रचंड कार्यकर्तृत्वाच्या, राजासारख्या जिगर असणाऱ्या, मुस्लीमांना सभोवतालच्या परिस्थितीने पोतराजा बनाविल्याचे ज्यावेळी लक्षात येईल, तो दिवस, मुस्लीमाचे दशावतारांना कायमची तिलांजली देणारा ठरेल, यात तीळमात्र शंका नाही. दिवसातील काळी वेळच धर्मकारण आणि उर्वरीत सर्व वेळ, निव्वळ आणि निखळ समाजकारण, असे सर्वांनीच अंगीकारण्याची वेळ आता आली आहे. त्यादृष्टीने भारतीय मुस्लीमांनी वाटचालीची दिशा बदल्यास निश्चितच त्यांची सर्वच प्रकारची दुर्दशा, दशाही बदलणार आहे.

रक्त गट मॅच होणाऱ्या भिन्न धर्मिय, भिन्न जातीय, भिन्न वर्णाच्या, बंधु भगिनींचे रक्त, एकमेकांना जीवदान देत असेल तर, त्यातून फक्त अन् फक्त माणुसकीच अधोरेखित होते. हेच मानवतेच्या भावनेचे सत्य, जीवनाची अविभाज्य सोच, समज बनविली पाहिजे. नमाजमध्ये, एकत्र जेवताना, किंवा अन्यत्र वागताना, मुस्लीम कसलाही भेद पाळत नाहीत, मात्र बेटी व्यवहार करताना त्यांची भावना संकुचित का होते. मुस्लीमांतील शेकडो जाती, जमाती, वर्गातील प्रत्येकाने बेटी व्यवहाराच्या कार्यकक्षा वाढविल्या पाहीजेत, मर्यादितचे सर्व भेद मिटवून मुलामुलींची लग्ने मुस्लीमांच्या कोणत्याही जातीतल्या यथायोग्य तरुण, तरुणी बरोबर केली पाहीजेत. उच्च-कनिष्ट, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा, अशा भेदांना गाडले पाहीजे. या बदलाने मुलामुलींच्या लग्नाचे प्रश्न निकाली निघतील . सर्वश्रेष्ट पवित्र काबा येथे स्त्री - पुरुष भेद पाळला जात नाही. मात्र जिच्या पैरोतले जन्नत असते, असे सांगीतले जाते, त्या माँ ला गावगाड्यातल्या मशिदी, दर्गे, कबरस्थान येथील प्रवेशाबाबत वेगळा न्याय का लावला जातो. यावर विचार झाला पाहीजे, चिंतन झाले पाहीजे.

बहुतांश मुस्लीमांच्या घरात आढळणाऱ्या बचतीच्या डब्ब्यातील पैसा यापुढच्या काळात फक्त अन् फक्त शिक्षणाच्या कामी खर्च झाला पाहीजे, हा निर्धार मुस्लीमांनी केल्यास, देशात २२ कोटी मुस्लीम आहेत, असे गृहीत धरून ५ कोटी मुस्लीम परिवारांनी प्रतिदिनी फक्त १० रुपये बचत त्या डब्यात टाकल्यास एका कुटूंबातून वर्षाला ३६५० रुपये उपलब्ध होतील. वरचे ६५० सोडून देत ३ हजार रुपये विचारात घेतल्यास ५ कोटी परिवारातून प्रति वर्षी १५ हजार कोटी सहजरित्या संकलीत होतील. शिवाय धार्मिक कार्यात खर्च होणाऱ्या पैशाला निम्म्यावर आणल्यास आणि किमान १ कोटी परिवारातून वाचणारा तो निम्मा पैसा, प्रती परिवार ५० हजार गृहीत धरल्यास, यातूनही ५० हजार कोटी रुपये उपलब्ध होतील. अशा प्रतिवर्षीच्या ६०-६५ हजार कोटीच्या उपलब्धतेतून प्रचंड ताकदीच्या, सर्व प्रकारच्या अध्ययनाच्या अनेक शैक्षणीक संस्था, समृद्ध विद्यापीठ, बार्टी-सारथी-महाज्योति सारखी परिपूर्ण संशोधन, अभ्यास केंद्रे साकारतील. प्रारंभापासून शेवटपर्यतचे प्रत्येक विभागाचे परिपूर्ण शिक्षण मोफत,सक्तीचे देता येईल , जेवणखाण, कपडालत्ता, शैक्षणिक साहित्य, आरोग्य सुविधा, प्रवासासाठी मदत करणे यातून शक्य होईल. याद्वारे विद्यार्थी, विद्यार्थिनींना परिपूर्ण बनवता येईल. जगाच्या बाजारात फुटबॉल सारखे टणाटण उड्या मारणाऱ्या, प्रगतीची दालने समृद्ध करणाऱ्या, इथल्या शैक्षणीक व्यवस्थातून शिकून गेलेल्या आणि सर्व क्षेत्रात कमवते बनलेल्या विद्यार्थ्यांनी, आपल्या मागच्या शिकणाऱ्या मुस्लीम भावंडांसाठी प्रतिवर्षी एक महिन्याचे वेतन द्यायचे ठरविल्यास, या उपलब्ध होणाऱ्या शेकडो कोटीतूनही या मुस्लीमांच्या शैक्षणीक व्यवस्था प्रचंड मजबुत होतील. येणाऱ्या २५ - ३० वर्षात मुस्लीमांच्या शैक्षणीक प्रगतीचे चित्र जगाने दखल घ्यावे, असे प्रचंड पालटेल. असा मला विश्वास वाटतो.


सर्वच बाजुंनी आर्थिक तणावाच्या संकटात वावरणाऱ्या मुस्लीमांनी आरोग्याबाबत केवळ काही सवयी बदल्यास आरोग्यावर खर्च होणारे हजारो रुपये ते वाचवू शकतात. अनेक आजारांचे, स्थुल पणाचे मुख्य कारण ठरणाऱ्या, प्रचंड प्रमाणात, प्रतिदिनी केल्या जाणाऱ्या मांसाहाराला पंधरवडा, महिन्यातून , एकदा, तेही अल्प से, असे मर्यादित केल्यास जीवन सुकर होईल. त्याच्या जोडीला जेवणाआधी, जेवणानंतर एक तासाने बसून घोट घोट पाणी पिण्याची सवय लावल्यास अथवा शक्य झाल्यास प्रतिदिनी ३-४ लिटर घोट घोट करीत कोमट पाणी पिण्याचे वेळापत्रक बनविल्यास आणि दिवसातून दोन अथवा तीन वेळेस भाजीपाला फळफळावळ युक्त जेवणाची सवय अंगिकारल्यास प्रत्येक घरात आरोग्य नांदेलच नांदेल. शेतात उभा असताना आणि जाळतानाही २४ तास ऑक्सीजन सोडणारा, कपडे, घड्याळे , वगैरे कमीत कमी दोन हजार प्रकारची पर्यावरण पुरक उत्पादने बनविता येणारा बांबु लागवड आणि उद्योगाला मुस्लीमांनी आत्मसात करावे. कोणत्याही प्रकारच्या जमीनीत, अति अत्यल्प पाण्यात, कमी श्रम, खते औषधे विना, एकदाच्या लागवडीतून ७०-७५ पुन्ह पुन्हा उत्पादन देणारे बांबू पिक मुस्लीमांसाठी आर्थिक परिवर्तनाची मोठी नांदी ठरू शकते. तसेच प्रचंड प्रमाणात मोफत उपलब्ध होणाऱ्या पवन उर्जा , सौर उर्जेलाही मुस्लीमांनी उत्पन्नाचे साधन बनवावे. सेंद्रिय भाजीपाला, फळ फळावळ निर्मिती साठी माती विना शेती या तंत्राने आरोग्य व प्रगती साधावी. शेकडो प्रकारचे ग्रामीण उद्योग, कुटीरोद्योग उभे करीत आपल्या महिलांनाही विकसीत करावे . मत्सपालन, शेळी, मेंढी , गाय, म्हैस पालन, शेतीपुरक विविध उद्योग, कुक्कुटपालन, रेशीम उत्पादन, दुग्ध व्यवसाय, लहान जनावरांचे मांस परदेशी पाठवणारी गाव गाड्यातील कारखानदारी विकसीत केली जावी.

कोल्हापूर येथील मुस्लीम विषयाचे गाढे अभ्यासक, हिंदी है हम, हिंदोस्ता हमारा !, या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष असलेल्या हुमायुन मुरसल यांनी २२ नोहेंबर २०१८ रोजी लिहीलेल्या. मुस्लीमांना आरक्षणाची सर्वाधिक गरज, मग यावर कुणीच का बोलत नाही, प्रदिर्घ लेखात आरक्षणासंदर्भात सखोल मांडणी केली आहे. त्यांच्या अभ्यास निष्कर्षानुसार मुस्लीमांना आरक्षण देण्यात कोणतीच अडचण येवू शकत नाही. साधारणतः १८८० पासून स्वातंत्र्यापर्यत मुस्लीम मागास,अति मागासांना वेगवेगळ्या राज्यांमध्ये आरक्षण दिले जात होते असे त्यांनी अधोरेखित केले आहे. मुस्लीमांच्या स्थितीविषयीचा अभ्यास करणाऱ्या शासनाने नेमलेल्या अनेक समिती, आयोग, कमिशन ने मुस्लीमांना आरक्षण देणे न्यायाचे, गरजेचे असल्याचे नमुद केले आहे. तामीळनाडू राज्यात स्थानीक राज्य शासनाकडून दिलेल्या ६९ टक्के आरक्षणाच्या १९९३ च्या कायद्याला केंद्र सरकारने ७६ वी घटना दुरुस्तीने घटनेच्या ९ व्या परिशिष्टात त्याचा समावेश करून कोर्टाच्या हस्तक्षेपापासून संरक्षीत केल्याचे हुमायून मुरसल यांनी त्या लेखात नमुद केले आहे. मग याच न्यायाने प्रत्येक राज्याच्या आरक्षणाची मर्यादा वाढवून त्या आरक्षणाला केंद्र सरकारने घटना दुरुस्तीद्वारे या वाढीव आरक्षणाला कोर्टाच्या हस्तक्षेपापासून संरक्षीत केल्यास मुस्लीम मागास व इतर मागास प्रवर्गाना न्याय देणे क्रमप्राप्त ठरेल, असे माझ्यासारख्याला वाटते.

मुस्लीमांना ५ टक्के आरक्षण मिळाले असते तर केंद्रीय नोकरीत ९ लाख ३० हजार आणि राज्यात ४६००० हक्काच्या जागा मुस्लीमांना मिळाल्या असत्या. त्या नोकऱ्या न मिळाल्याने मुस्लीम समाज दरवर्षी ३४ हजार कोटी रुपये गमावतो असल्याचा निष्कर्ष हुमायून मुरसल यांनी मांडला आहे. स्वातंत्र्याच्या गत ७३ वर्षात मुस्लीमांना आरक्षण न मिळाल्याने झालेल्या नुकसानीचा आकडा काही लाख कोटीत जाण्याची शक्यता आहे, असे मला निष्कर्षाने वाटते.

राजकीय सत्तेपासून पुर्णतः बेदखल असणारा मुस्लीम समाज आधूनिक नवविचारापासून खुपच लांब आहे. तीव्र गतीने होणारे आर्थिक जागतिक आणि राजकीय बदल, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास वाढते उद्योग या सर्व बाबतीत मुस्लीम संदर्भहीन बनत चालला आहे. न्या.राजेंद्रसिंह सच्चर आणि न्या .रंगनाथ मिश्रा या दोन केंद्रीय आयोगांनी मुस्लीमांची स्थिती दलितांहून विदारक असल्याचे सप्रमाण मांडणी करणारा अहवाल सरकारला सादर केला . या दोन्ही आयोगांनी मुस्लीमांना ओबेसींना आरक्षणाचे फायदे मिळत नसल्याचे अधोरेखित केले असल्याचे हुमायून मुरसल यांनी या लेखातून निदर्शनास आणले आहे.

माझ्या सारख्याची यावर भाष्य करणारी भुमिका अशी, देश-राज पातळीवर आरक्षण मर्यादा ९० टक्के पर्यत नेणारा बदलाव घटनेत आणावा. ही मागणी असंवैधानिक वाटत असली तरी संविधान सर्वांच्या हितासाठीच आहे . तामीळनाडू सरकारने त्या राज्यापुरती का होईना आरक्षण मर्यादा ६९ टक्क्यापर्यत नेली आहे. त्याच न्यायाने सर्वच धर्मातल्या उपेक्षित, वंचित, मागास, घटकांना न्याय देताना आरक्षणाची मर्यादा ९० टक्क्यापर्यत वाढविल्यावर फारसे काही अघटीत होईल असे माझ्यासारख्याला वाटत नाही. मागणी केल्या प्रमाणे ९० टक्के राहीले ७५ - ८० टक्क्यापर्यत आरक्षण मर्यादा वाढविल्यास ते सर्वांना न्याय दिल्या सारखे होईल . मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम समाजातील मदारी, दरवेशी, छप्परबंद, पिंजारी, रंगारी,..... आणि अशा इतर मागास जातींना आरक्षण मिळावे यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यामुळे उच्च न्यायालयाने ५% शिक्षणात आरक्षण असावे अशी शिफारस केली होती. (नोकरीत नाही) ... मात्र राजकीय इच्छाशक्ती अभावी हे ५% शैक्षणिक संस्था प्रवेश आरक्षणही लाभले नाही. याबाबत मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रा.शमशुद्दीन तांबोळी यांनी निदर्शनास आणले. आता इडब्लूएस तथा आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू असलेल्या १०% आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी मुस्लीम तरूण तसे प्रमाणपत्र काढत नाहीत. हे प्रमाणपत्र मिळवण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी समाजातल्या सर्व स्तरातल्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. समाज आधुनिकतावादी करणे, धर्मांधतेचा प्रभाव कमी करणे हाही एक महत्त्वाचा भाग आहेच. मुस्लीमांचा ओबीसी प्रवर्गातला समावेश त्यांना आरक्षण मिळवून देण्यात फारसा लाभदायक ठरताना दिसत नाही. ओबीसी प्रवर्गातल्या अनेक बलदंड जाती मुस्लीमां पर्यत हे आरक्षण येवूच देत नाही. केवळ दिखाव्यालाच मुस्लीमांचा ओबीसीतला समावेश ठरतो . फायदा काहीच होत नाही. हे चित्र बदलले पाहीजे. त्याउपर सर्व धर्मातल्या प्रत्येकाला, जाती जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात हे आरक्षण द्यावे. हे आरक्षण, शिक्षण, नोकरी, राजकीय व्यवस्था, सहकाराचे क्षेत्र, खाजगी कंपन्या, खाजगी उद्योग, व्यवसाय, धार्मिक व्यवस्था इत्यादींमध्येही अनिवार्य केले जावे. कायद्याच्या कडक अंमलबजावणीतून प्रत्येक घटकाला आरक्षणाचा लाभ मिळण्याची यंत्रणा उभी केली जावी. खाजगीकरणातून शिक्षण व्यवस्था, इतर शासकीय व्यवस्था चालविण्याचे, आरक्षण विना नोकरभरती करण्याचे बंद केले जावे. सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत व सक्तीचे केले जावे. सर्व प्रकारच्या खर्चिक आरोग्य सुविधाही, प्रत्येकाला मोफतच पुरविल्या जाव्यात . मुस्लीमांना सरसकट १० टक्के आरक्षण द्यावे . १९३६ ते १९५० पर्यत सर्व धर्मीयातील अति मागासांसाठी खुली असणारी एस.सी.आणि एस.टी. आरक्षणाची सवलत १९५० साली राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या घटनेखालील अध्यादेशाने ती हिंदू पुरती मर्यादीत करण्यात आली. नंतरच्या घटना दुरुस्त्यां द्वारे एस.टी.ची सवलत निधर्मी करण्यात आली. एस.सी. च्या आरक्षणात शिख आणि नवबौद्ध बांधवांचा समावेश करण्यात आला . १९३६ ते १९५० पर्यत एस.सी.ची सवलत मिळणाऱ्या मुस्लीम खाटीक, मुस्लीम मोची, मुस्लीम मेहतर यांसारख्या अति मागास, धर्मांतरीत नवमुस्लीमांना, नवबौध्दांप्रमाणे अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये समाविष्ट केले जावे. त्यासाठी तातडीने घटना दुरुस्ती केली जावी. मौलाना आझाद महामंडळाला प्रतिवर्षी ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करून द्यावेत. बार्टी, सारथी, महाज्योति च्या धर्तीवर मौलाना आझाद महामंडळ विकसीत करावे.मुस्लीमांच्या जन्म, शाळा दाखल्या मध्ये जातीची नोंद केली जात नाही. यामुळे जात पडताळणी करताना मुस्लीम मागासांची आर्थिक पिळवणूक करून त्यांना हतबल केले जाते. परिवारातल्या एखाद्याची पूर्वी जात पडताळणी झाली असल्यास, त्या परिवारातल्या सर्वांना न मागता जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य-केंद्र सरकारकडून केला जावा. भावकी, बुडक्याच्या, नात्यातल्यांचे जात पडताळणी पत्र, त्याने केलेली शिफारस मुख्य पुरावा ग्राह्य धरून जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी करणाऱ्या मुस्लीम मागासांना महिनाभराच्या आत जातपडताळणी प्रमाणपत्रे देण्याबाबत राज्य - केंद्र सरकारने धोरण स्विकारावे. धार्मिक ध्रुवीवरणातून निष्पाप मुस्लीमांवर सर्वत्र हल्ले होत आहेत. कित्येक निष्पाप, निरागस मुस्लीमांना हकनाक जीव गमवावा लागल्याची अनेक उदाहरणे देशासमोर आहेत. देशातल्या मुस्लीमांच्या हजारो मालमत्ता जाळण्याचा, पाडण्याचा, अरबो-खरबोंचे नुकसान करण्याचा प्रकार धर्मांध झुंडीनी केला आहे. या सर्व अप्रिय घटना पासून मुस्लीमांना संरक्षण मिळण्यासाठी, दलित बांधवांच्या सुरक्षेसाठीच्या ॲट्रासिटीच्या मजबुत कायदा-कवचाची मुस्लीमांना सद्य स्थितीत नितांत गरज आहे. देशातल्या-राज्यातील सरकारांनी मुस्लीमांच्या संरक्षणासाठी कडक ॲट्रोसिटी कायद्याची अंमलबजावणी करून मुस्लीमांचे हमदर्द, पाठीराखे बनावे. बस एवढेच या लेखन प्रपंचातून सुचवावेसे वाटते.

सादिक खाटीक आटपाडी जि. सांगली

प्रदेश महासचिव,
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभाग महाराष्ट्र .
प्रदेश कार्यकारणी सदस्य,
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी महाराष्ट्र राज्य .
Mobile Number
९६६५७५३२९१/९१६८१६६०५९
Email id
khatiksadikgmail.com

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## संस्कृती जोपासणे ही काळाची गरज : उत्तमराव इंदलकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** युवा पिढी सर्वगुणसंपन्न होण्यासाठी वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साखर संघाचे संचालक उत्तमराव इंदलकर यांनी म्हसवड येथे केले. कृषी विकास प्रतिष्ठान संचालित क्रांतिवीर इंग्लिश मीडियम स्कूल म्हसवड येथे विद्यार्थी मार्गदर्शन उपक्रम आयोजित केला होता. प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य साखर संघाचे संचालक उत्तमराव इंदलकर, सहकारातील ज्येष्ठ नेते विकास गायकवाड उपस्थित होते,तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष कृषिरत्न विश्वंभर बाबर होते. यावेळी बोलताना उत्तमराव इंदलकर म्हणाले, बदलत्या परिस्थितीमध्ये वाचाल तरच वाचाल ही म्हण अत्यंत खरी आहे. शालेय जीवनात वाचन तसेच अवांतर वाचन महत्त्वाचे आहे.




**म्हसवड : येथील क्रांतिवीर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मार्गदर्शन करताना राज्य साखर संघाचे संचालक उत्तमराव इंदलकर**

वाचन संस्कृती जोपासली तरच युवक सर्वगुणसंपन्न होऊ शकतो. वाचनाचा छंद तुम्हाला यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जाऊ शकतो.अभ्यासाचे नियोजन करा, त्यामध्ये सातत्य ठेवा, जिद्द चिकाटी बाळगा, थोरामोठ्याचे चरित्र वाचून त्या माध्यमातून प्रेरणा घ्या. नेहमी सकारात्मक रहा.आपल्या बुद्धीचा परिपूर्ण वापर करा.संघर्षातून वाटचाल करा. अडचणीवर मात करा व आदर्श नागरिक होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन इंदलकर यांनी केले.

यानिमित्ताने इंदलकर यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विकास प्रतिष्ठान संस्थेने सीबीएसई पॅटर्न च्या माध्यमातून क्रांतिवीर इंग्लिश मीडियम स्कूल ही माणदेशी युवकासाठी एक प्रकारची देणगी दिलेले आहे. या पॅटर्नचा उपयोग राष्ट्रीय स्तरावरील विविध परीक्षेसाठी खात्रीशीरपणे होणार असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थी व पालकांना यांना केले. संस्था व शाळेच्या दर्जेदार व्यवस्थापनाबद्दल इंदलकर यांनी गौरव उद्गार काढले.

यावेळी संस्थाध्यक्ष कृषिरत्न विश्वंभर बाबर, यांनी मनोगत व्यक्त करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. प्राचार्य राहुल फुटणे यांनी प्रास्ताविक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार उपशिक्षिका सुवर्ण टाकणे यांनी व्यक्त केले.

## विठ्ठलनगर येथील गणपती मंडळाची आरती दतात्रय पाटील यांच्या हस्ते संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी येथील कै. विठ्ठलराव जाधव गणेश तरुण मंडळ व पैलवान ग्रुप, विठ्ठलनगर यांच्या वतीने गणपती बसविला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणपती बसवला असून दररोज वेगवेगळे आरतीचे मानकरी असतात दि. २४ रोजी कै. विठ्ठलराव जाधव गणेश तरुण मंडळ व पैलवान ग्रुप, विठ्ठलनगर या मंडळाच्या गणपती आरती चे मानकरी दत्तात्रय (पंच) पाटील यांच्या यांच्या शुभहस्ते करण्यात आली.



**आटपाडी : येथील कै. विठ्ठलराव जाधव गणेश तरुण मंडळ व पैलवान ग्रुप, विठ्ठलनगर मंडळाच्या गणपतीची आरती करताना दातात्रय पाटील**

यावेळी तुकाराम जाधव, शिवाजी जाधव, राजेंद्र जाधव, दत्ता माने, सिद्राम पवार, पै. विराट जाधव इंजि.सुनिल जाधव, पै.नागेश जाधव , पै.शिवम चव्हाण, कैलास जाधव, रामण्णा जाधव, राहुल जमखंडे, गोपी पवार, शंकर पवार, नाना पवार, विशाल बनसोडे, सागर पाटील, सुनिल गायकवाड, आकाश बनसोडे, राहुल पाटील, यल्लाप्पा पवार, विजय बनसोडे, संजय देशमुख, मारुती देशमुख इंजि.विजय शिंगाडे, पै.सुजल जाधव, पै.रोहन जाधव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यामध्ये महिला देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## ‘जवान’ने रचला नवा विक्रम!

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शाहरुख खानच्या बहुचर्चित ‘जवान’ चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. ७ सप्टेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने नवनवीन रेकॉर्ड निर्माण केले आहेत. या चित्रपटाने पहिल्या दिवशी ७५ कोटींची कमाई केली होती. चित्रपट प्रदर्शन होऊन १८ दिवस झाले असतानाही अद्याप या चित्रपटाची क्रेझ कमी झालेली नाही. अशातच चित्रपटाच्या १८ व्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत. सॅकनिल्क'च्या आकडेवारीनुसार प्रदर्शनाच्या १८ व्या दिवशी या चित्रपटाने १५.६९ कोटींची कमाई केली आहे. या कमाईला धरुन या चित्रपटाचे आत्तापर्यंतचे एकूण कलेक्शन ५६२ कोटी रुपये झाले आहे. चित्रपटाच्या कमाईचा वेग पाहता लवकरच हा चित्रपट भारतात ६०० कोटींचा आकडा पार करु शकतो. ‘जवान’ हा सर्वात जलद ५०० कोटींची कमाई करणारा




पहिला चित्रपट ठरला आहे.

ॲटली दिग्दर्शित ‘जवान’ चित्रपट परदेशातही दमदार कमाई करत आहे. जवानने आतापर्यंत जगभरात १ हजार कोटींचा टप्पा पार केला आहे. हिंदीबरोबर तमिळ तेलगूमध्येही या चित्रपटाने जबरदस्त कमाई केली आहे. कमाईच्या बाबतीत या चित्रपटाने ‘पठाण’ आणि ‘गदर २’ लाही मागे टाकले आहे. शाहरुखचाच चित्रपट पठाणला जगभरात १००० कोटी रुपये कमवण्यासाठी २६ दिवस लागले होते. मात्र जवानने अवघ्या १८ दिवसात जगभरात १००० कोटींचा व्यवसाय केला आहे.

## अपयश लपविण्यासाठी समितीच्या कार्यकर्त्यांवर आरोप : श्याम ऐवळे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** अपयश लपविण्यासाठी आटपाडीचे संचालक शरद चव्हाण हे समितीच्या कार्यकर्त्यांवर आरोप करत असल्याची टीका शिक्षक समितीचे माजी तालुकध्यक्ष श्याम ऐवळे यांनी केली. पुढे बोलताना ते म्हणाले, शिक्षक बँकेच्या इतिहासात शिक्षक बँक बचाव कृती समितीची गर्दी आणि घोषणाबाजी पाहून सत्ताधारी संचालकांनीच सभेच्या प्रवेशद्वारावर चौकीदाराची भुमिलानअगदी चोख प्रामाणिक भूमिका बजावून पक्षपातीपणा केला. यातच व्यवस्था परिवर्तन कारभार यांचे व्यवस्थित परिवर्तनाचे अपयश बँक सभासदांना दिसून आले. आटपाडीचे संचालक शरद चव्हाण यांना कावीळ झाल्याप्रमाणे फक्त आटपाडीचेच कार्यकर्ते रात्रंदिवस त्यांच्या स्वप्नामध्ये दिसत असतात. सत्ताधारी अंडी वाल्यांचे कोणी समर्थन करणार नाही. परंतु, पुराव्यानिशी



**श्याम ऐवळे**

आरोप करा. अन्यथा बँक बचाव कृती समितीचे कार्यकर्ते आपणास जशास तसे उत्तर देऊन कायद्याच्या भाषेत आपणाला उत्तर दिले जाईल असा इशारा श्याम एवळे यांनी दिला आहे.

सत्ताधाऱ्यांनी बॅनर बाजी करून सभासदांच्या हक्काचे १ कोटी ५४ लाख रुपये नफा इमारत निधीच्या नावाखाली वर्ग करून घाई गडबडीत ठराव मंजूर करून घेतल्याने शिक्षक बँक बचाव समिती च्या कार्यकर्त्यांनी आपला निषेध नोंदवून बाहेरच्या प्रांगणात मोठ्या संख्येने समांतर सभा चालवली. मोठ्या प्रमाणात शिक्षक बँक बचाव कृती समितीच्या कार्यकर्त्यांची सभासदांची गर्दी हेच या वार्षिक सभेचे वैशिष्ट्य होते. यावेळी बँक बचाव कृती समितीचे निमंत्रक यु टी जाधव, जगन्नाथ कोळपे,सदाशिव पाटील शशिकांत बजबळे, संतोष कदम महेश शरणाथे यांच्यासह सर्व पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

## जाहीर टेंडर नोटीस २०२२-२३

### सुचना क्र. ३

**ग्रामपंचायत खरसुंडी ता-आटपाडी-जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहोरबंद निविदा ब-१ व दर पत्रक मागणी करारावर मागविनेत येत आहेत.तरी खालील नमूट केलेल्या कामानुसार दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमधील निविदा मागणी अर्ज दिलेनंतर निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिले जातील. मुदतीमध्ये आलेल्या निविदेचाच फक्त विचार केला जाईल.**

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | ज्या दर सूचीवर आधारित आहे ते वर्ष | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे खरसुंडी ता. आटपाडी येथील शशिकांत जावीर घर ते गवराबाई कांबळे सिमेंट रस्ता करणे | १५ वित्त | २०२३-२४ | २८२०००/- | ब -१ | २००/- | ३०००/- | २६-९-२०२३ | ६-१०-२०२३ वेळ ११.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर |
| २ | मौजे खरसुंडी ता.आटपाडी येथील जनाई मंदिर ते झरे रोड सार्वजनिक मुतारी पर्यंत बंदिस्त गटर करणे. | १५ वित्त | २०२३-२४ | २५००००/- | ब -१ | २००/- | २५००/- | २६-९-२०२३ | ६-१०-२०२३ वेळ ११.०० वाजे पर्यत | ३ महिने | सुभे |
| ३ | मौजे खरसुंडी ता.आटपाडी येथे रंजना बाळू केंगार ते धनाजी इंगवले ते पोपट भिसे शेत घर पाईपलाईन करणे. | १५ वित्त | २०२३-२४ | १६९०४१/- | ब -१ | २००/- | १७००/- | २६-९-२०२३ | ६-१०-२०२३ वेळ ११.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ४ | मौजे खरसुंडी ता.आटपाडी येथे किसन जावीर घर भानुदास केंगार घर पाईपलाईन करणे. | १५ वित्त | २०२३-२४ | १४६५१४/- | ब -१ | २००/- | १५००/- | २६-९-२०२३ | ६-१०-२०२३ वेळ ११.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर |

**१) संपूर्ण भरलेली निविदा सांक्षाकिंत प्रतीसह दोन लिफाफा पध्दतीत सिलबंद लखोटयासह ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जमा करावे. लिफाफा क्र. १ मध्ये जि.प. नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र, अटी व शर्ती मान्य असलेचे हमीपत्र, कामाचा अनभुव दाखला, इ. सर्व कागदपत्रे असावित. २) लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रक सादर करावे. ३) प्राप्त निविदा दि. ९/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडणेत येईल. ४) उपरोक्त कामाचे बायाणा रक्कम डीडी जमा करावे. ५) उपरोक्त कामाचे बायाणा व कोऱ्या निविदा किंमत भरणा डी.सी.सी. बँक शाखा-खरसुंडी खाते क्र. ०२१०५०९०००००५२ या खातेवर जमा करावे. सदर निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. कामासंबंधीची सर्व माहिती कार्यालयीन वेळेत मिळेल.**

ठिकाण:- ग्रामपंचायत खरसुंडी ता. आटपाडी

XXX
ग्रामसेवकग्रामपंचायत खरसुंडी
ता. आटपाडी जि. सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत खरसुंडी
ता. आटपाडी जि. सांगली









# श्री शंकर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/विष्णू भोंगळे :** श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर कारखान्याची वार्षिक सर्व साधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, विधान परिषदेचे आमदार तथा श्री शंकर सहकारी चे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, विधानसभेचे आमदार राम सातपुते, शिवामृत दूध संघांचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील, जि.प. माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, महर्षी कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख, शिवामृत दुध संघाचे व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे, सूतगिरणीचे चेअरमन तुकाराम (आप्पा) काळे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.




सदाशिवनगर : येथील श्री शंकर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बोलताना चेअरमन रणजीतसिंह मोहिते पाटील समोर उपस्थित सभासद

यावेळी चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाले, श्री शंकर सहकारी एफआरपी पेक्षा १३५ रु. ज्यादा दर देणार असून दिवाळी मध्ये उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे. तसेच कारखान्याच्या साखर प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तारीकरण कामाच्या भांडवली खर्चास मंजुरी घेण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन मिलिंद कुलकर्णी यांनी सभेचे प्रास्ताविक केले, तर सभेचे विषय वाचन जनरल मॅनेजर रविराज जगताप तर आभार संचालक दत्तात्रय रणवरे यांनी मानले. यावेळी कारखान्याचे सर्व संचालक, विविध संस्थाचे संचालक, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर स्वरूप देशमुख, कार्यकारी संचालक अभिजित डुबल, सभासद शेतकरी, व्यापारी, ग्रामस्थ, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गत हंगामात गाळप झालेल्या उसाचा दुसरा हप्ता ४०० रुपये द्या

## महेश खराडे : अन्यथा साखर वाहतूक करणाऱ्या गाड्या अडविणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली/प्रतिनिधी :** गत हंगामात गाळप झालेल्या उसाचा दुसरा हप्ता ४०० रुपये द्या, अन्यथा २ ऑक्टोबर पासून साखर वाहतूक करणाऱ्या गाड्या अडवू, फोडू असा इशारा निवेदनाद्वारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने साखर सम्राटांना देण्यात आला. दत्त इंडिया आणि मोहनराव शिंदे, राजारामबापू ,हुतात्मा, क्रांती सोनहिरा, विश्वास आदी कारखान्यांना निवेदन देण्यात आले आहे.



सांगली : हंगामात गाळप झालेल्या उसाचा दुसरा हप्ता ४०० रुपये द्या मागणीचे निवेदन देताना महेश खराडे व उपस्थित शेतकरी

यावेळी बोलताना महेश खराडे म्हणाले, गत गाळप हंगाम सुरू झाला त्यावेळी साखर विक्री ३१ रुपये किलो होती. साखरेचा तुटवडा निर्माण झाल्याने साखर ३६ ते ३८ रुपये किलो या भावाने साखर कारखानदार विक्री करत आहेत. बाजारात साखर ४५ ते ५० या भावाने विकली जात आहे. कारखानदारांना ६ ते ७ रुपये प्रति किलो तर क्विंटल पाठीमागे ६०० ते ७०० रुपये ज्यादाचे मिळाले आहेत. त्यातील ४०० रुपये शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करावेत अन्यथा २ ऑक्टोबर पासून साखर कारखान्यातून बाहेर जाणाऱ्या साखरेची वाहतूक रोखली जाईल गाड्या फोडल्या जातील असा इशारा देण्यात आला आहे.

पुढे बोलताना महेश खराडे म्हणाले, ४०० रुपये संघटना का मागतेय, कारण ऊस उत्पादनाचा प्रति टन उत्पादन खर्च २६०० रुपये झाला आहे. खते, वीज, मजुरी, तननाशके, पाणीपट्टी, डिझेल, मशागत, तोडणीसाठी पैसे, एन्ट्री आदींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. खर्च आणि उत्पादनाचा मेळ लागेना झाला आहे. त्यातच यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस उत्पादन घटले आहे. या सर्व बाबीचा विचार करून ४०० रुपये द्यावेत अन्यथा साखर वाहतूक रोखण्याचा इशारा दिला. यावेळी पोपट मोरे, संदीप राजोबा, संजय बेले, बाबा संद्रे, भरत चौगुले, बाळासाहेब लिंबेलाई, धन्यकुमार पाटील, मुकेश पाटील, रोहित पाटील, जगन्नाथ भोसले, आनंद शेटे, प्रकाश पाटील, शान्तिलाला लिंबेकाई, अभिनंदन चौगुले, बापू सणगर, नंदू नलवडे, उमेश मुळे, पिंटू पाटील, अधिक जाधव आदीसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# मिलिंद एकबोटे वर गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



मिलिंद एकबोटे

**पुणे :** पुणे महापालिकेसमोर बेकायदा जमाव जमवून समाजात तेढ निर्माण करणारे भाषण केल्याप्रकरणी समस्त हिंदू आघाडीचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याप्रकरणी समस्त हिंदू आघाडीचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांच्यासह पुण्यश्लोक पुनर्निर्मिती समितीचे अध्यक्ष कुणाल सोमेश्वर कांबळे, किरण चंद्रकांत शिंदे, विशाल दिलीप पवार यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कसबा पेठेतील पुण्येश्वर मंदिर परिसरातील प्रार्थनास्थळावरुन वाद सुरू आहे. पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन करण्यास परवानगी नाकारण्यात आली आहे. कुणाल कांबळे आणि मिलिंद एकबोटे यांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर जमाव जमवला. दोन समाजात जातीय तेढ निर्माण करणारे भाषण केले. जमावबंदी आदेशाचा भंग केल्याने संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक भोलेनाथ अहिवळे तपास करत आहे.




# मतदान केंद्राची प्रारुप यादी प्रसिध्द

## सूचना ३ ऑक्टोबरपर्यंत नोंदवाव्यात : जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मतदान केंद्राची प्रारुप यादी व अस्तित्वात असलेल्या मतदान केंद्रांची यादी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीररीत्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. याबाबत सूचना व हरकती असल्यास त्यांनी ३ ऑक्टोबर २०२३ पर्यंत नोंदवाव्यात, असे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी कळविले आहे.

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ (अर्हता दिनांक ०१ जानेवारी, २०२४ वर आधारीत) अंतर्गत मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील ०८ विधानसभा मतदार संघाअंतर्गत येणाऱ्या एकूण २४१५ यादी भागांमध्ये राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने पूर्व पुनरिक्षण उपक्रमाचा एक भाग म्हणून भारत निवडणूक आयोगाकडील निर्देशानुसार दि. २१ जुलै २०२३ ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व पुर्नरचना देखील करण्यात येत आहे.

सांगली जिल्ह्यातील एकूण ८ विधानसभा मतदार संघामध्ये मिळून एकत्रितरित्या मतदान केंद्राच्या नावातील बदलाचे एकूण ११६, मतदान केंद्राच्या स्थानातील बदलाचे एकूण ५९, चशीसश करण्यात आलेले ३५ मतदान केंद्र व भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार एका मतदान केंद्रावरील १५०० मतदारापेक्षा अधीक क्षमता होणाऱ्या मतदान केंद्राच्या बाबतीत नव्याने प्रस्तावीत होणारे एकूण-०६ मतदान केंद्राची संख्या आहे. असे एकूण २४२१ मतदान केंद्राच्या सूसुत्रीकरणाचे व पुर्नरचनेचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावीत बदल हे सर्व विधानसभा मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयाकडून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयास मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्याकरीता प्राप्त झालेले आहेत. सदर बदल व अस्तित्वात असलेल्या मतदान केंद्राची यादी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सांगली यांच्या कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर जाहीररित्या प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या बाबत कोणासही कोणत्याही सूचना द्यावयाची असल्यास ३ ऑक्टोबर २०२३ पर्यंत वा त्यापूर्वी द्याव्यात.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एकत्रितरित्या प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. वरील नमूद बदलाचे प्रस्ताव मा. भारत निवडणूक आयोगाकडून मंजूर झाल्यास सदर एकत्रितरित्या प्रसिध्द होणाऱ्या प्रारूप मतदार यादीमध्ये सदरचे बदल अंमलात येतील व त्या आधारे मतदान केंद्राचे सुसूत्रिकरण व पुर्नरचना देखील अस्तित्वात येईल. सदरची जाहीर नोटीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे नोटीस बोर्डावर जाहिर प्रसिध्दी करण्यात आली आहे, असेही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी कळविले आहे.

# अंडी टोळीवर कारवाई होणार : शरद चव्हाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या ७१ व्या सर्वसाधारण सभेत अस्तित्वहीन आणि वैफल्यग्रस्त झालेले विरोधक दिसून आले.



शरद चव्हाण

शिक्षक बँकेच्या इतिहासात सर्वप्रथम महिलांनी पहिल्यांदा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कधी नव्हे ती अतिशय शांततेत सभा जवळजवळ दीड तास चालली. उपस्थित सभासदांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सभेमध्ये चेअरमन यांचे वतीने दिले गेले. असे असताना आपले काहीच चालत नाही हे ओळखुन स्टंट दाखवण्याच्या प्रयत्नात आटपाडीच्या शिक्षक समितीच्या अंडी टोळीने स्टेजच्या दिशेने २ अंडी भिरकावली. ज्यामध्ये आटपाडी शिक्षक समितीतील काही शिक्षकांची नावे समोर आली आहेत. ज्यांनी हे कृत्य केले ते अतिशय निंदनीय असून शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे कृत्य केले आहे.

विरोध हा लोकशाही पद्धतीने नोंदवला पाहिजे परंतु नैराश्याने बेभान झालेले काहीही करत सुटले आहेत. असे दुष्कृत्य करणाऱ्या वर निश्चित कायदेशीर कडक कारवाई होईलच व त्यांचे सभासदत्व ही बँकेच्या वतीने रद्द करण्यात येईल. अशी माहिती आटपाडीचे संचालक शरद चव्हाण यांनी दिली.

# आटपाडी पूर्व भागात युवा नेते वैभव पाटील यांचा शेतकऱ्यांशी सवांद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**निंबवडे/राघव मेटकरी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या गटात सामील झाल्यापासून खानापूर आटपाडीचे नेते विटा नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष वैभव पाटील मतदार संघात पायाला भिंगरी लावून फिरत आहेत. विटा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष वैभव पाटील हे 'वैभव सवांद सेतू' या कार्यक्रमाच्या निम्मिताने मतदार संघात फिरत आहेत. आज त्यांनी आटपाडी तालुक्यातील पूर्व भागात दौरा केला. यावेळी त्यांनी आंबेवाडी , पिंपरी खुर्द, जाधव मळा या भागातील शेतकऱ्यांशी सवांद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला.



आटपाडी : आंबेवाडी येथे भेट देत शेतकऱ्यांशी सवांद साधताना युवा नेते वैभव पाटील

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावर्षी तालुक्यात फार कमी पाऊस आहे. टेंभू योजनेच्या पाण्याने थोडा दिलासा दिला असला, तरी सुद्धा राजेवाडी, दि पूजारवाडी, पिंपरी खुर्द, आंबेवाडी ,बोंबेवाडी या माणगांगा नदी पलीकडच्या गावांना अजून टेंभू योजनेचे पाणी नाही. त्यामुळे त्या भागात दुष्काळाची स्थिती आहे असे प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित झाले.

तालुक्यात पाणी टंचाई बरोबर एक महिनाभर पुरेल एवढाच चारा शिल्लक आहे. त्यामुळे सरकारकडे पाठ पुरावा करून उपाययोजना करण्याचा शब्द वैभव पाटील यांनी दिला. यावेळी आंबेवाडी चे विजय मेटकरी , पिंपरी खुर्द सोसायटी चे चेअरमन तुकाराम जाधव, आटपाडी पूर्व भागातील जेष्ठ नेते गोरख (काका) देशमुख , नाथा पुजारी, राहुल मेटकरी आटपाडी पूर्व भागातील अनेक शेतकरी उपस्थित होते.




# पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन



सांगली : येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन करताना डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झालेल्या या अभिवादन कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे, उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार लीना खरात यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# चिंतामणीनगर येथील रेल्वे उड्डाण पुलाचे काम जलद गतीने पूर्ण करा : डॉ. सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** वाहतुकीची होणारी कोंडी आणि लोकहिताचा विचार करून चिंतामणीनगर येथील रेल्वे उड्डाण पुलाचे काम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने सुरू करून हे काम जलद गतीने पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. या परिसरातील नागरिकांना वाहतुकीची सोय व्हावी यासाठी रेल्वे उड्डाण पुलाचे खाली पर्यायी व्यवस्था करावी, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री डॉ सुरेश खाडे यांनी रेल्वे व संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.



सांगली : चिंतामणी नगर येथे सुरु असलेल्या रेल्वे पुलाची कामाची पाहणी करताना पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे व जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी

सांगली-तासगाव रोडवरील चिंतामणीनगर येथील रेल्वे उड्डाण पुल बांधकाम अनुषंगाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथील पालकमंत्री कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, महापालिका आयुक्त सुनील पवार, मध्य रेल्वेच्या दक्षिण झोनचे मुख्य अभियंता सुरेश पाखरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, महापालिकेचे उपायुक्त राहुल रोकडे उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले, चिंतामणीनगर व परिसरातील लोकांना रहदारीची सोय व्हावी यासाठी रेल्वे पुलाखाली करण्यात येणाऱ्या पर्यायी रस्त्यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने रेल्वे विभागास पत्र द्यावे. रेल्वेनेही यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक यंत्रणेस उपलब्ध करून द्यावे. यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करून देण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

तत्पूर्वी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगली-तासगाव रोडवरील चिंतामणीनगर येथील रेल्वे उड्डाण पुल बांधकाम परिसराची पाहणी केली.उड्डाण पूल, परिसरातील नागरिकांसाठी पर्यायी मार्ग याबाबत अधिकारी व नागरिकांशी चर्चा केली व या परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य दिले जाईल असे उपस्थित नागरिकांना आश्वासित केले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, महापालिका आयुक्त सुनील पवार, मध्य रेल्वेच्या दक्षिण झोनचे मुख्य अभियंता सुरेश पाखरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रंतीकुमार. मिरजकर, महापालिकेचे उपायुक्त राहुल रोकडे, रेल्वेचे अधिकारी शंभो चौधरी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.